ePaper

**राहुल गांधी यांची आज शिवाजी पार्कवर सभा; सोनिया, शरद पवार, उद्धव ठाकरेंची उपस्थिती**

| वर्ष - 7 | अंक - 299 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- लवकरच आपला गाशा गुंडाळलेले संघ
- ते मला हातोड्याने मारायचे
- निवडणुकीचा बिगुल वाजला!
- महायुतीत मिठाचा खडा?


www.mahaenews.com | रविवार, दिनांक 17 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बारणेंच्या उमेदवारीला भेगडेंचाही विरोध!

# मावळात महायुतीत 'मिठाचा खडा!

## » आधी आ . सुनिल शेळके आता बाळा भेगडेही म्हणतात उमेदवार बदला






। पिंपरी ।महाईन्यूज

**देशातील लोकशाही उत्सवाचे म्हणजेच लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजूनही महाराष्ट्रातील महायुतीमधील जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटताना दिसत नाही. विशेषत: मावळ लोकसभा मतदारसंघात हे अधिक किचकट होत असून महायुतीचा तिढा वाढतच आहे. विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्या उमेदवारीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समर्थक आमदार सुनिल शेळके विरोध करत आहेत. तर आता भाजपाच्या तिकिटाची अपेक्षा असलेल्या खासदार बारणे यांना भाजपाकडूनही विरोध वाढत आहे. माजी मंत्री बाळा भेगडे यांच्या समर्थकांनी भेगडे यांच्या निवासस्थानी जमत खासदार बारणे यांच्या निवडीला तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे या मतदारसंघात खासदार बारणेंची राजकीय वाटचाल खडतर बनली असल्याचे चित्र आहे.**

गेल्या वर्षी लोकसभेला ज्या पद्धतीने स्पष्ट लढत होत्या. ते चित्र सध्या दिसत नाही. राज्यात गेल्या पाच वर्षात वेगाने राजकीय उलथापालथी झाल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हात धरत अनेक आमदार आणि खासदार सत्तेचा मुकूट घालून बसले. मात्र एन निवडणुकीत हाच मुकूट काटेरी ठरताना दिसत आहे. महायुतीमध्ये भाजपा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी सहभागी आहे. परिणामी उमेदवारीचा गुंता वाढणारच ही राजकीय वस्तुस्थिती होती. झालेही तसेच. सध्या अनेक लोकसभा मतदारसंघात जागा कोणत्या पक्षाला सोडायची यासाठी चर्चेचे घोडे अडलेलेच आहे. तीच गत शिरूर आणि मावळ लोकसभेत आहे. मावळ लोकसभेत विद्यमान खासदार श्रीरंग बारणे दोन वेळा निवडून आले आहेत. गेल्या वर्षी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचाच पराभव करत ते लोकसभेत ढेरेदाखल झाले. त्यामुळे खासदार बारणे यांचे नाव देशभरात चांगलेच चर्चेत आले होते. मात्र याच बारणेंना सध्या उमेदवारीसाठी खटपट करण्याची वेळ आली आहे. मावळ लोकसभेच्या जागेवर भाजपाने दावा केला आहे. राष्ट्रवादीचे आमदार सुनिल शेळके यांनी देखील दावा करत खासदार बारणे यांना उघड विरोध सुरू केला आहे. भाजपाला जागा सुटल्यास त्यामधून तिकिट मिळावे यासाठी खासदार बारणे प्रयत्नशील असल्याची चर्चा आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीबरोबरच आता भाजपामधूनही त्यांना तीव्र विरोध होताना दिसत आहे.

### ...अन्यथा संजोग वाघेरेंना फायदा ?



» मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या जागा वाटपाचे आणि उमेदवार निवडीचे त्रांगडे अद्याप सुटलेले नाही. त्याचा अप्रत्यक्ष फायदा महाविकास आघाडीला म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे यांना होण्याची शक्यता आहे. त्यांची उमेदवारी स्पष्टपणाने जाहिर करण्यात आली असून ते प्रचाराला देखील लागले आहेत. पिंपरी, चिंचवड, मावळसह उरण, कर्जत आणि पनवेल मध्ये त्यांचा भेटीगाठींचा दौराही पुर्ण झाला आहे. मात्र दुसरीकडे महायुतीमध्ये ही जागा कोणाला सोडायची, सोडली तर उमेदवारी कोणाला द्यायची या प्राथमिक चर्चाच सुरू आहेत. त्याचा महायुतीला फटका बसण्याची शक्यता आहे.

# पोलीस आयुक्तालयातील परिमंडळांची पुनर्रचना

## » राज्य शासनाची मान्यता : पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात तिसऱ्या परिमंडळात शासनाने मान्यता दिली. त्यानंतर आठ महिन्यांनी या परिमंडळांची पुनर्रचना करण्यात आली आहे.**




पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाची सुरुवात 15 ऑगस्ट 2018 रोजी झाली आयुक्तालयाच्या सुरुवातीला दोन परिमंडळांची रचना करण्यात आली. सुरुवातीला शहर पोलिसांच्या हद्दीत 14 पोलीस ठाण्यांचा समावेश होता. त्यानंतर चिखली, शिरगाव, महाळुंगे एमआयडीसी, रावेत हे चार पोलीस स्टेशन नव्याने सुरू करण्यात आले. पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील वाढते नागरिकरण, औद्योगीकरण, शहरीकरण, शैक्षणिक संस्था, वाहनांची संख्या लक्षात घेता आणखी एका परिमंडळाची गरज निर्माण झाली, त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करत तिसरे परिमंडळ मंजूर करून घेतले. सप्टेंबर 2023 मध्ये तिसऱ्या परिमंडळाला शासनाने मान्यता दिली. परिमंडळ तीनचे पहिले पोलीस उपायुक्त म्हणून संदीप डोईफोडे यांची नियुक्ती करण्यात आली होती.

आठ महिन्यानंतर तीनही परिमंडळांची पुनर्रचना करण्यात आली आहे. रावेत पोलीस ठाणे परिमंडळ दोनच्या वाकड विभागात होते. नव्या रचनेनुसार रावेत पोलीस ठाणे परिमंडळ एकच्या चिंचवड विभागात आणले आहे.

### परिमंडळांची सुधारित रचना

**» परिमंडळ एक**

पिंपरी विभाग – पिंपरी पोलीस ठाणे, भोसरी पोलीस ठाणे, सांगवी पोलीस ठाणे

चिंचवड विभाग – चिंचवड पोलीस ठाणे, निगडी पोलीस ठाणे, रावेत पोलीस ठाणे

**» परिमंडळ दोन**

देहूरोड विभाग – तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाणे, तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, देहूरोड पोलीस ठाणे, शिरगाव परंदवडी पोलीस ठाणे

वाकड विभाग – वाकड पोलीस ठाणे, हिंजवडी पोलीस ठाणे

**» परिमंडळ तीन**

चाकण विभाग – चाकण पोलीस ठाणे, महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे, आळंदी पोलीस ठाणे

भोसरी विभाग – दिघी पोलीस ठाणे, भोसरी एमआयडीसी पोलीस ठाणे, चिखली पोलीस ठाणे

# स्थायीच्या बैठकीत 300 कोटींचे प्रस्ताव

## » दिवसभर महापालिकेत ठेकेदार, माजी लोकप्रतिनिधींचा राबता

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**आचारसंहिता लागू होण्याच्या पूर्वसंध्येला दोन टप्प्यांत झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत तब्बल ३०० कोटींच्या कामांचे १७५ पेक्षा जास्त प्रस्ताव मंजूर करण्यात आले. दिवसभर ठेकेदार आणि माजी लोकप्रतिनिधींचा राबता महापालिकेत दिसून आला. पाणीपुरवठा, वाहतूक, प्रकल्प विभाग अशा बहुतांश सर्व विभागांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे या कामांचा मार्गही मोकळा झाला आहे.**



महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्याकडून अंदाजपत्रक सादर करताना वेगवेगळ्या कामांसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या कामांच्या निविदा चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यापूर्वी म्हणजे मार्च महिन्यातच काढणे आवश्यक आहे. त्यातच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे निविदा काढण्यासाठीची लगबग महापालिकेच्या विविध खात्यांमध्ये सुरू झाली होती. गेल्या दोन दिवसांपासून शेकडो कोटींच्या अनेक निविदा मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यात आल्या होत्या. महापालिकेच्या स्थायी समितीची गुरुवारी (१४ मार्च) होणारी बैठक शुक्रवारी पुढे ढकलण्यात आली होती. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात २५० कोटींचे शंभरहून अधिक प्रस्ताव मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर संध्याकाळच्या टप्प्यात उर्वरित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.घोरपडी येथील पुणे-मिरज रेल्वे मार्गिकेवर रेल्वे उड्डाणपूल बांधणे आणि मुकुंदराव चौक येथे उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर बांधण्यासाठी मे. एस. एस. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची ९५ कोटी २१ लाख रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे. राज्याच्या जलसंपदा विभागाने पाणीपट्टीच्या देयकापोटी महापालिकेकडे ८१२ कोटींची मागणी केली आहे. या थकबाकीपैकी १०० कोटी रुपये महापालिकेने जलसंपदा विभागाला द्यावे, अशी सूचना कालवा समितीच्या बैठकीत पालकमंत्री अजित पवार यांनी महापालिकेला केली होती. त्यानुसार ८५ कोटींचे वर्गीकरण करून १०० कोटी रुपये जलसंपदा विभागाला देण्याचे मान्य करण्यात आले. नालेसफाईच्या ११ कोटींच्या २३ निविदांना स्थायी समितीने मंजुरी दिली असून, पाषाण तलावातील जलपर्णी काढण्यासाठी ९३ लाख ३५ हजारांची कामेही मंजूर करण्यात आली आहेत. सोमवार पेठ, मंगळवार पेठ, रास्ता पेठ येथील रस्ते डांबरीकरण करणे.

### वर्गीकरणांच्या प्रस्तावांनाही मंजुरी

» दोन टप्प्यांत झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत तब्बल ३०० कोटींच्या कामांचे १७५ पेक्षा जास्त प्रस्ताव मंजूर करण्यात आले. विविध स्थापत्यविषयक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. वांजळे चौकापर्यंतचा विकास आराखड्यातील रस्ता विकसित करणे, कै. रामचंद्र बनकर क्रीडा संकुलामध्ये विविध स्थापत्यविषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली असून, पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात डायस प्लॉट, भवानी पेठ, लुल्लानगर परिसरात जलवाहिन्या टाकण्याची कामे करणे आणि जलवाहिन्यांची दुरुस्ती करणे अशा कामांचाही यामध्ये समावेश आहे.हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभागामध्ये टँकरने पिण्याचे पाणीपुरवठा करण्यासाठी ९९ लाख ९९ हजारांचा खर्च मंजूर करण्यात आला आहे. हडपसर साडेसतरा नळी साधना बँक ते सर्वेक्षण क्रमांक १७६, १७७, २४१, २४२ येथील नाल्यावरील अस्तित्वातील कल्व्हर्टचे ठिकाणी आर.सी.सी. कल्व्हर्ट पुलाचे काम करण्यात येणार असून, त्यासाठी एक कोटी ७१ लाख ५५ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. शंकरशेठ रस्ता ते गुरुनानकनगर पदपथ विकसित करणे, सायकल मार्ग नव्याने तयार करण्याबरोबरच विविध कामांसाठीच्या वर्गीकरणांच्या प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली आहे.

# मेट्रोबाहेर प्रायोगिक तत्त्वावर ‘शेअर’ रिक्षाची सुविधा

## » सर्वेक्षण पुढील आठवड्यापासून सुरू करण्यात येणार

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मेट्रोच्या चार मुख्य स्थानकांवरून ‘शेअर’ रिक्षा सुविधा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय महामेट्रोबरोबर झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. यासाठीचे सर्वेक्षण पुढील आठवड्यापासून सुरू करण्यात येणार आहे.**



दिवसांपूर्वी मेट्रो स्थानकाबाहेर शेअर रिक्षा सुरू करण्यासंदर्भात चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष, ‘वेकअप पुणेकर’ अभियानाचे संयोजक मोहन जोशी आणि रिक्षा पंचायतीचे सरचिटणीस नितीन पवार यांच्या पुढाकाराने महामेट्रो आणि रिक्षा पंचायत यांची एकत्रित बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय झाला असून महामेट्रोकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे जोशी यांनी सांगितले.महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि जनसंपर्क विभागाचे हेमंत सोनावणे, तसेच मेट्रो मार्गावरील पौड रस्ता, शिवाजीनगर, राजा बहादूर मोतीलाल मिल (बंडगार्डन) रस्ता परिसरातील रिक्षा पंचायतीचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. मुंबईमध्ये लोकल ट्रेन स्थानकाबाहेर शेअर रिक्षांची रांग दिसते. तशी रांग मेट्रो स्टेशन बाहेर दिसत नाही. शेअर रिक्षा वापरासाठी पुणेकरांची मानसिकता तयार करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. रिक्षांची रांग ज्या मेट्रो स्थानकाबाहेर लागू शकेल, अशा मार्गांचा आढावा घेणे, तिथे जागेची उपलब्धता करून देणे आणि प्रायोगिक तत्त्वावर शेअर रिक्षा सुरू करणे, असे निर्णय बैठकीत झाले.पहिल्या टप्प्यात दोन ते चार मेट्रो स्थानकांबाहेर शेअर रिक्षा सुरू करण्यात येणार असून, त्यानंतर प्रतिसादानुसार या सेवेचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. त्याबाबतचे सर्वेक्षण पुढील आठवड्यात सुरू होईल, अशी माहिती मोहन जोशी आणि नितीन पवार यांनी दिली. दरम्यान, महामेट्रोच्या मुख्य कार्यालयाशेजारील कामगार पुतळा परिसराचे सुशोभीकरण करण्याची तयारी मेट्रो प्रशासनाने दर्शविली आहे.‘वेकअप पुणेकर’ या चळवळीच्या वाहतूक या विषयासंदर्भातील परिषदेत काही दिवसांपूर्वी मेट्रो स्थानकाबाहेर शेअर रिक्षा सुरू करण्यासंदर्भात चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष, ‘वेकअप पुणेकर’ अभियानाचे संयोजक मोहन जोशी आणि रिक्षा पंचायतीचे सरचिटणीस नितीन पवार यांच्या पुढाकाराने महामेट्रो आणि रिक्षा पंचायत यांची एकत्रित बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय झाला.

### स्थानकाबाहेर शेअर रिक्षांची रांग

» मेट्रोच्या चार मुख्य स्थानकांवरून ‘शेअर’ रिक्षा सुविधा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय महामेट्रोबरोबर झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. यासाठीचे सर्वेक्षण पुढील आठवड्यापासून सुरू करण्यात येणार आहे. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि जनसंपर्क विभागाचे हेमंत सोनावणे, तसेच मेट्रो मार्गावरील पौड रस्ता, शिवाजीनगर, राजा बहादूर मोतीलाल मिल (बंडगार्डन) रस्ता परिसरातील रिक्षा पंचायतीचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. मुंबईमध्ये लोकल ट्रेन स्थानकाबाहेर शेअर रिक्षांची रांग दिसते.

# पिंपरी-चिंचवड: चिखलीत 200 एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राला आयुक्तांची मंजुरी!

## » भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहराची आगामी ४० वर्षात होणारी लोकसंख्या वाढ आणि पाण्याची मागणी याचा विचार करुन प्रस्तावित २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाला चालना देण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पातून २६७ एमएलडी पाणी उपलब्ध करण्यासाठी भाजपा सत्ताकाळात प्रकल्प हाती घेण्यात आले. त्याअंतर्गत चिखली येथे १०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वयीत झाला असून, त्याद्वारे समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा सुरू झाला आहे. आता चिखली येथील प्रस्तावित २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू करावी. आगामी काळात होणारी लोकसंख्या वाढ आणि पाण्याची मागणी याचा विचार करुन प्रशासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी भूमिका घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी प्रभावीपणे पाठपुरावा सुरू केला होता. याबाबत महिनाभरापूर्वी आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. त्यानंतर आयुक्तांनी शुक्रवारी मंजुरी देवून महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावला आहे.

> “ शहरातील आगामी ४० वर्षांतील वाढत्या नागरिकरणाचा विचार करुन भामा आसखेड धरणातून थेट पाईपलाईनद्वारे पाणी पिंपरी-चिंचवड शहरात आणण्यात येणार आहे. त्या अंतर्गत १०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वीत करुन त्याचे लोकार्पण झाले आहे. आता चिखली येथे २०० एमएलडी क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्पाला महापालिका प्रशासनाने मंजुरी दिली आहे. लवकरच कामाला सुरूवात होईल. डिसेंबर २०२५ पर्यंत या प्रकल्पातून तळवडे, चिखली, मोशी, चऱ्होली आणि दिघी परिसरात पाणी पुरवठा सुरू होईल. महायुती सरकारच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### महापालिकेचा सकारात्मक प्रतिसाद...

**» आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांमध्ये वाढलेली लोकसंख्या आणि पाण्याची गरज याचा विचार करता भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे प्रस्तावित २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम त्वरीत हाती घ्यावे, अशी सूचना केली होती. त्याला महापालिका प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि कार्यवाही सुरू केली. शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. चिखली, तळवडे, मोशी, चऱ्होली, दिघी, डुडूळगाव, जाधववाडी या गावातील पाणी प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.**

---

# तब्बल ९४१ पदवीधरांना ‘ऑन दी स्पॉट ऑफर लेटर’

## » राष्ट्रवादीचा रोजगार मेळावा : शेखर काटे यांच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्पर्धेच्या युगामध्ये युवक-पदवीधरांना नोकरीच्या संधींसाठी प्रचंड संघर्ष करावा लागत आहे. मात्र, राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून आयोजित केलेल्या रोजगार व मार्गदर्शन मेळाव्यात एकाच दिवसात तब्बल ९४१ पदवीधरांना ‘आन दी स्पॉट ऑफर लेटर’ मिळाले. त्यामुळे पदवीधर उमेदवारांच्या चेहऱ्यावर आनंद पहायला मिळाला..**




राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी-चिंचवड शहर व पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आणि पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या वतीने आणि युवकचे शहराध्यक्ष शेखर काटे यांच्या पुढाकाराने भव्य रोजगार मेळावा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उद्घाटन युवक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, मा. विरोधी पक्षनेते नाना काटे, ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, राजेंद्र जगताप, महिला अध्यक्ष कविताताई आल्हाट, कार्याध्यक्ष फजल शेख , भोसरी विधानसभा अध्यक्ष पंकज भालेकर, पिंपरी विधानसभा अध्यक्ष विशाल काळभोर, माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, निलेश पांढारकर, राजू लोखंडे आणि माजी नगरसेविका माया बारणे, चंदाताई लोखंडे, सुमनताई पवळे, युवती अध्यक्ष वर्षा जगताप, महिला निरीक्षक शितलताई हगवने, युवक प्रदेश उपाध्यक्ष विशाल वाकडकर, चिंचवड विधानसभा महिला अध्यक्षा संगीता कोकणे, उद्योग व्यापार अध्यक्ष श्रीकांत कदम, माजी सैनिक सेल अध्यक्ष बाबाजी खामकर, महिला संघटक पुष्पा शेळके, पिंपरी विधानसभा संघटक नारायण बहिरवाडे, बचत गट महासंघ अध्यक्ष ज्योती गोपने, सामाजिक न्याय विभाग महिला अध्यक्ष गंगाधेंडे, वर्षा शेडगे, आशा शिंदे, साफ सफाई कामगार महिला अध्यक्ष सुवर्णा निकम, युवक कार्याध्यक्ष तुषार ताम्हणे, प्रसन्ना डांगे, प्रसाद कोलते, युवक प्रवक्ते चेतन फेंगसे, मुख्य समन्वयक युवक प्रशांत सपकाळ पिंपरी विधानसभा युवक अध्यक्ष अक्षय माचरे, चिंचवड विधानसभा युवक अध्यक्ष प्रतीक साळुंखे, भोसरी विधानसभा युवक अध्यक्ष सागर बोराटे,पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिजनेस मॅनेजमेंटचे फाउंडर रमणप्रीत सिंग आदी उपस्थित होते.

प्रा. रामकृष्ण मोरे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, प्राधिकरण, आकुर्डी येथे आयोजित रोजगार मेळाव्याला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### सुमारे 4 हजार युवकांचा सहभाग...

» सुमारे ४ हजार तरुणांनी या मेळाव्यात सहभाग घेतला. २ हजार ८०० हून अधिक पदवीधर युवकांनी ऑनलाईन मुलाखतींसाठी नोंदणी केली, तर ८७६ युवकांनी प्रत्यक्ष मेळाव्यात विविध कंपन्यांकडे मुलाखती दिल्या आहेत. त्याद्वारे ९४१ पदवीधरांना तात्काळ नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्यात आली. बहुतांश उमेदवारांना ‘ऑफर लेटर’ उपलब्ध झाले आहेत. कंपनी व्यवस्थापनांकडून ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आगामी काळात होणार आहेत. विशेष म्हणजे काही उमेदवारांना तीन-तीन ऑफर भेटल्या आहेत. सहभागी होणाऱ्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती होणार असून, त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येणार आहे.

# 25 टक्के आरक्षणापासून मोकळीक




**सरकारने नुकत्याच काढलेल्या अधिसूचनेमुळे २५ टक्के आरक्षण ठेवण्याची विनानुदानित शाळांवरची सक्ती रद्द होणार आहे. मुलांच्या निवासापासून एक किलोमीटर परिसरात शाळा असणे आवश्यक आहे, या शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीला त्यामुळे धक्का लागू शकतो.**

२००९ च्या शिक्षणहक्क कायद्यातील तरतुदीनुसार विनाअनुदानित शाळा, केंद्रीय शाळा, नवोदय आणि सैनिकी शाळांमधील (विनाअनुदानित शाळा) २५ टक्के जागा वंचित गटातील मुलांसाठी आरक्षित ठेवण्याची तरतूद आहे. ही तरतूद अनुदानित आणि शासकीय शाळांना लागू होत नाही.राज्य शासनाने दिनांक ९-२-२०२४ रोजी अधिसूचना काढून २०११ च्या शिक्षणहक्क नियमांत बदल केले. त्यानुसार विनाअनुदानित शाळेपासून एक किलोमीटर परिसरात अनुदानित / शासकीय शाळा असली तर २५ टक्के आरक्षण ठेवण्याची तरतूद त्या विनाअनुदानित शाळेला लागू होणार नाही; आणि अशी विनाअनुदानित शाळा प्रतिपूर्तीला पात्र ठरणार नाही. अनुदानित आणि शासकीय शाळा प्रत्येक गावात असल्यामुळे बहुसंख्य विनाअनुदानित शाळांवरची २५ टक्के आरक्षण ठेवण्याची सक्ती रद्द होणार आहे. मुळात, केंद्र सरकारच्या २००९ च्या कायद्यातली तरतूद राज्यसरकारच्या नियमांत बदल करून रद्द करता येईल का, हा कायदाविषयक प्रश्न आहे. दुसरे असे की मूळ कायद्यानुसार मुलांच्या



निवासापासून एक किलोमीटर परिसरात शाळा असणे आवश्यक आहे. मग विनाअनुदानित आणि अनुदानित शाळांमधील अंतराचा संबंध येतो कुठे? समजा एखाद्या वंचित कुटुंबाच्या निवासापासून एक किलोमीटरवर विनाअनुदानित शाळा आणि त्यापुढे एक किलोमीटरवर अनुदानित शाळा आहे. अशा प्रसंगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश मिळणार नसेल तर त्या मुलांना दोन किलोमीटर दूरच्या अनुदानित शाळेत जावे लागेल. हे कायद्याचे धडधडीत उल्लंघन ठरेल. खरे तर हा विषय खूप गुंतागुंतीचा आहे. त्याबाबत समजून घेऊया. साधारणपणे विनाअनुदानित शाळा इंग्रजी माध्यमाच्या तर अनुदानित / शासकीय शाळा मराठी, गुजराती, हिंदी इत्यादी माध्यमाच्या असतात. २५ टक्के आरक्षणातून घेतलेला प्रवेश इंग्रजी माध्यमासाठी असतो. तिथे प्रवेश मिळाला नाही तर मोफत शिक्षणाचा एकमेव पर्याय म्हणून त्यांना अन्य माध्यमाच्या अनुदानित / शासकीय शाळेत प्रवेश घ्यावा लागेल. माध्यमाची निवड बरोबर की चूक, हे बाजूला ठेवू. पण त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा कसा विचार करणार?

आता गावोगावी इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळा सुरू झाल्या आहेत. तिथल्या अनुदानित व शासकीय शाळांचे असे म्हणणे आहे की, २५ टक्के आरक्षणामुळे आमची मुले इंग्लिश शाळेत जातात; आमचे पट कमी झाल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरतात; तुकड्या व शाळा बंद पडतात आणि मातृभाषेतून शिक्षण देण्याचे तत्त्व बाजूला पडते. कायद्यानुसार २५ टक्के आरक्षणाद्वारे प्रवेश मिळालेल्या मुलांच्या खर्चाची प्रतिपूर्ती राज्य सरकारने करायची आहे. राज्य सरकार ते करत नाही. त्यामुळे, विनाअनुदानित शाळांचाही आरक्षणाच्या तरतुदीला विरोध आहे. या विरोधात तथ्य आहे, हे मान्य करावे लागेल. समाजाच्या सर्व स्तरातील मुलांनी एकत्र शिकावे; श्रीमंत आणि गरिबांच्या शाळा वेगवेगळ्या होऊ नयेत, हा या तरतुदीमागचा मूळ हेतू. परंतु अशा रीतीने भिन्न स्तरातील मुलांना सक्तीने एकत्र शिकवताना वंचितांच्या मुलांना वागणूक कशी मिळेल, त्यांच्यासाठी ते अडचणीचे तर ठरणार नाही ना, अशा शंका सुरुवातीपासून होत्या. प्रत्यक्षात काय घडले, हा संशोधनाचा विषय आहे. असे ऐकीवात आहे की, एका संस्थेने कंटेनरचा वापर वर्गखोली म्हणून केला आहे. ते खरे असेल तर त्यात कोणत्या मुलांना बसवले असेल, हे वेगळे सांगायला नको. आता याच्या पुढची महत्त्वाची गोष्ट. उपरोल्लेखित अधिसूचनेनंतर शासनाच्या निर्देशानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी दिनांक ६-३-२०२४ रोजी सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना एक पत्र लिहून कळविले की, २०२४-२५ वर्षाची आरटीई २५ टक्के प्रक्रिया करण्यासाठी जिल्हापरिषदेच्या आणि सर्व प्राधिकरणांच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांची ऑनलाईन नोंदणी १८-३-२०२४ पर्यंत करण्यात यावी. संचालकांनी पत्रात नमूद केले आहे की, उपरोल्लेखित अधिसूचनेने बदललेल्या नियमांनुसार ही नोंदणी करायची आहे. वास्तविक तसा उल्लेख सदर अधिसूचनेत किंवा नियमांत आढळून येत नाही.

## संपादकीय »

# तो सूर बने हमारा!

***खाद्यासंस्कृतीवर कोणत्याही धर्माचे शिक्के मारण्यापेक्षा त्यातली देवाणघेवाण हाच अधिक सुसंस्कृत आणि रसिक मार्ग आहे...***

दिल्लीच्या लाल किल्ल्यावरील पंतप्रधानांचे भाषण दूरदर्शनवरून प्रसारित झाल्यानंतर पीयूष पांडे यांनी लिहिलेले, अशोक पत्की यांनी संगीत दिलेले आणि पं. भीमसेन जोशी, एम. बालमुरलीकृष्ण, लता मंगेशकर यांच्यासह काहींनी गायलेले 'मिले सूर मेरा तुम्हारा' हे गाणे 'दूरदर्शन'वरून प्रदर्शित झाले आणि त्याने अवघ्या देशाला अक्षरश: वेड लावले. कला, क्रीडा यांसह वेगवेगळ्या क्षेत्रांतले त्या काळातले नामवंत त्या गाण्यात आपल्या देशात असलेल्या विविधतेतील एकतेबद्दल इतक्या सहजपणे सांगतात की तसे कुणी त्याआधी ऐकले-बघितले नव्हते. जेमतेम ३५ वर्षांपूर्वी या देशात, आपल्या आसपास असे काही घडत होते, सगळ्या देशाचे शरीर आणि आत्मा एकच आहे असे वाटावे असे काही वातावरण होते यावर आज कुणी तरी विश्वास ठेवेल का, या प्रश्नाचे उत्तर नाही, असेच द्यावे लागेल, असे बरेच काही आज घडताना दिसत आहे.

निवडणूक रोखे योजना घटनाबाह्य आणि म्हणून बेकायदा असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर अखेर आता स्टेट बँकेने त्यांच्या ताब्यातील माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सुपूर्द केल्यामुळे सध्या चर्चा सुरू आहे ती कोणी किती दिले, देणारे आधी अडचणीत होते आणि रोखे-खरेदीनंतर नव्हते.

# रोखे रोखल्यानंतर आपण पुढे काय करणार

देणगी आणि सरकारी मोबदला यांचा संबंध आहे का? यातल्या 'देवाण घेवाणी'चे प्रकार काय असू शकतात, याचीच.ही चर्चा बिनमहत्त्वाची नसली तरी मुद्दा 'नागरिकांना संपूर्ण माहिती पारदर्शकपणे मिळणे' हा आहे. स्टेट बँकेच्या म्हणण्यानुसार, देणगीदार आणि प्राप्तकर्त्यांची जुळणी कमी दिवसांत करणे अशक्य होईल. सर्वोच्च न्यायालयाला दिलेल्या अर्जात, याच कारणासाठी बँकेने जूनपर्यंत वेळ वाढवण्याची विनंती केली होती (सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात मात्र अशी जुळणी करण्याचा उल्लेख नव्हता). मात्र स्टेट बँकेने जी 'यांच्याकडून यांना इतके मिळाले' प्रकारच्या जुळणीसाठी वेळ मागितला त्यातून त्यांनीच हे मान्य केले की, जूनपर्यंत ही माहिती देणे शक्य आहे- मग आता सर्वोच्च न्यायालयाने हीदेखील माहिती- भले जूनपर्यंत- द्या, असा आदेश स्टेट बँकेस जरूर द्यावा! बड्या देणगीदार कंपन्या आणि सरकार यांच्यात समजा काही 'देवाणघेवाण'



झालेली असेल तर ती या माहितीमुळे स्पष्ट होईल.हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे कारण तो थेट निवडणुकांच्या मुख्य घटकाशी- अर्थात राजकीय वित्तपुरवठ्याशी संबंधित आहे. याला मी मुख्य घटक म्हणतो कारण हा अर्थपुरवठाच आपल्या लोकशाहीच्या चारित्र्यावर सखोल परिणाम घडवतो. माजी अर्थमंत्री दिवंगत अरुण जेटली यांनीसुद्धा (ही रोखे योजना मांडताना) २०१७ च्या अर्थसंकल्पीय भाषणात म्हटले होते की, राजकीय निधीच्या पारदर्शकतेशिवाय मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका शक्य नाहीत. अशा पारदर्शकतेवर आधारित मुक्त, निष्पक्ष निवडणूक होणे, ही लोकशाहीची गरज. त्यामुळे ऐतिहासिक निर्णयासाठी न्यायालयाचे कौतुक केले पाहिजे, परंतु तो निर्णय म्हणजे एक टप्पा ठरतो, हे ओळखणेही आवश्यक आहे. उशिरा का होईना, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आपत्ती टळली, पण तेवढ्याने 'पारदर्शक राजकीय वित्तपुरवठा' या मूलभूत समस्येचे निराकरण झाले नाही. अनेक समीक्षक म्हणतात की आपण आता 'पुन्हा पहिले पाढे पंचावन्न' किंवा 'ये रे माझ्या मागल्या' स्थितीत आलो आहोत. म्हणूनच, यापुढे भारतीय लोकशाहीची वाटचाल सुधारू शकतील अशा पर्यायांचा विचार करणे अत्यावश्यक आहे. पण त्याआधी हाही विचार करू की खरोखरच आपण 'ये रे माझ्या मागल्या' स्थितीत परतलो आहोत का? नाही, हे निश्चित. वस्तुस्थिती अशी आहे की या निकालाने निवडणूक रोख्यांसंबंधीचा कायदा घटनाबाह्य ठरवला केला आहे, आणि त्या अनुषंगाने कंपनी कायदा, प्राप्तिकर कायदा,कायदा इत्यादी अन्य कायद्यांमधील सर्व संबंधित दुरुस्त्याही रद्दबातल ठरलेल्या आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बच्चू कडूंकडून महायुतीत मिठाचा खडा?

## ‘मी खासदार’ हे अभियान राबवून 400 उमेदवार उभे करणार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचे घटक असूनही प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू हे सातत्याने सरकारच्या विरोधात भूमिका घेत असल्याने पेच निर्माण झाला आहे. प्रत्येक मतदार संघात ‘मी खासदार’ हे अभियान राबवून ३०० ते ४०० उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा बच्चू कडू यांनी केल्याने भाजपसहित निवडणूक आयोगाचीही चिंता वाढण्याची शक्यता आहे. आमदार बच्चू कडू हे त्यांचे सहकारी आमदार राजकुमार पटेल यांच्यासह महाविकास आघाडीतून बाहेर पडत महायुती सरकारमध्ये सहभागी झाले.**

त्यांना मंत्रिपद मिळेल, अशी अपेक्षा प्रहारचे कार्यकर्ते व्यक्त करीत होते. पण, त्यांना वेळोवेळी मंत्रिपदाने हुलकावणी दिली. अनेकवेळा याविषयीची खंत बच्चू कडू व्यक्त करताना दिसले. अखेर बच्चू कडू यांना दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्षपद देऊन मंत्रिपदाचा दर्जा बहाल करण्यात आला. बच्चू कडू यांचे अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेतील अध्यक्षपद वाचविण्यासाठी सरकारने अध्यादेश काढून कडू यांच्याविरोधात दोन वर्षे अविश्वास ठराव आणता येणार नाही अशी तरतूद केल्याचे बोलले गेले. तरीही बच्चू कडू हे समाधानी दिसत नाहीत.

बच्चू कडू आणि महायुतीत गेल्या अनेक महिन्यांपासून संघर्ष होत आहे. त्यांनी याआधीही भाजपवरील नाराजी अनेकदा बोलून दाखवली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत जागावाटपावर चर्चा सुरू असताना भाजपने प्रहारला या चर्चेत सामावून न घेतल्यामुळे बच्चू कडू हे महायुतीवर नाराज असल्याचे सांगितले जात आहे. देशभरातील विरोधी पक्ष मतदान ‘ईव्हीएम’च्या माध्यमातून न घेता मतपत्रिकेवर घ्या, अशी मागणी करीत आहेत. त्याचीच री ओढत बच्चू कडू यांनी ‘ईव्हीएम’ला विरोध दर्शवला आहे. निवडणूक आयोगाला मतपत्रिकेवरच निवडणूक घ्यायला लावण्यास भाग पाडू असे, बच्चू कडू यांनी ठणकावून सांगितले आहे.बच्चू कडू यांनी ‘मी खासदार’ हे अभियान राबविण्याची तयारी केली आहे. एका मतदार संघात ३०० ते ४०० उमेदवार उभे करण्याची त्यांची योजना आहे. लोकांचे मतदान कुठे जाते, हे कळले पाहिजे. लोकशाहीत तो सर्वांचा अधिकार आहे. माझे मत कुणाला जाते, हे समजले पाहिजे, यासाठी आम्ही शेकडो उमेदवार उभे करू, त्यामुळे सरकार आणि निवडणूक आयोगाला लोकसभा निवडणूक मतपत्रिकेवर घ्यावी लागेल, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे. ‘ईव्हीएम’वर मतदान केल्यानंतर मत कुणाला गेले, हे कळत नाही. कुणाला मतदान केले, हे तपासण्याचा मुलभूत अधिकार ‘ईव्हीएम’ने हिरावून घेतला आहे. हा अधिकार आम्हाला मिळाला पाहिजे, शेतक-याच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. घरकुले मिळत नाहीत. शहर आणि ग्रामीण अशी मोठी तफावत आहे, हे सर्व मुद्दे समोर ठेवून ‘मी खासदार’ हे राज्यव्यापी अभियान राबविणार असल्याचे बच्चू कडू यांनी जाहीर केले आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठका झाल्या, त्यात आम्हाला चर्चेसाठी बोलविण्यात आले नाही. आम्ही मतदार संघात शेवटच्या माणसाला विचारतो, तशी भाजपची भूमिका दिसत नाही. आम्हाला देखील त्यांची फार काही गरज वाटत नाही. तो त्यांचा विचार आहे. आम्ही आमच्या विचाराने चालणार आहोत. जागावाटपाविषयी काय होईल, ते उघड करू, लपून-छपून काहीही करणार नाही, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले आहे. बच्चू कडू हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटासोबत जुळलेले आहेत. त्यांचा खरा संघर्ष हा भाजपसोबत आहे. त्यांना मंत्रिपद मिळेल, अशी अपेक्षा प्रहारचे कार्यकर्ते व्यक्त करीत होते. पण, त्यांना वेळोवेळी मंत्रिपदाने हुलकावणी दिली. अनेकवेळा याविषयीची खंत बच्चू कडू व्यक्त करताना दिसले. अखेर बच्चू कडू यांना दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्षपद देऊन मंत्रिपदाचा दर्जा बहाल करण्यात आला. बच्चू कडू यांचे अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेतील अध्यक्षपद वाचविण्यासाठी सरकारने अध्यादेश काढून कडू यांच्याविरोधात दोन वर्षे अविश्वास ठराव आणता येणार नाही अशी तरतूद केल्याचे बोलले गेले. तरीही बच्चू कडू हे समाधानी दिसत नाहीत.



### निवडणूक मतपत्रिकेवर घ्यावी

» बच्चू कडू आणि महायुतीत गेल्या अनेक महिन्यांपासून संघर्ष होत आहे. त्यांनी याआधीही भाजपवरील नाराजी अनेकदा बोलून दाखवली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत जागावाटपावर चर्चा सुरू असताना भाजपने प्रहारला या चर्चेत सामावून न घेतल्यामुळे बच्चू कडू हे महायुतीवर नाराज असल्याचे सांगितले जात आहे. देशभरातील विरोधी पक्ष मतदान ‘ईव्हीएम’च्या माध्यमातून न घेता मतपत्रिकेवर घ्या, अशी मागणी करीत आहेत. त्याचीच री ओढत बच्चू कडू यांनी ‘ईव्हीएम’ला विरोध दर्शवला आहे. निवडणूक आयोगाला मतपत्रिकेवरच निवडणूक घ्यायला लावण्यास भाग पाडू असे, बच्चू कडू यांनी ठणकावून सांगितले आहे.बच्चू कडू यांनी ‘मी खासदार’ हे अभियान राबविण्याची तयारी केली आहे. एका मतदार संघात ३०० ते ४०० उमेदवार उभे करण्याची त्यांची योजना आहे. लोकांचे मतदान कुठे जाते, हे कळले पाहिजे. लोकशाहीत तो सर्वांचा अधिकार आहे. माझे मत कुणाला जाते, हे समजले पाहिजे, यासाठी आम्ही शेकडो उमेदवार उभे करू, त्यामुळे सरकार आणि निवडणूक आयोगाला लोकसभा निवडणूक मतपत्रिकेवर घ्यावी लागेल, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे.

# चंद्रकांत खैरे हे कायम मला डावलत आहेत

## अंबादास दानवे यांची नाराजी, मराठवाड्यात चंद्रकांत खैरेंवर अरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राच्या राजकारणात एक राजकीय भूकंप होईल अशी चर्चा होते आहे. याचं कारण आहे अंबादास दानवे यांची नाराजी. मराठवाड्यात अंबादास दानवे हे चंद्रकांत खैरेंवर नाराज आहेत असं त्यांनी म्हटलं आहे. चंद्रकांत खैरे हे कायम मला डावलत आहेत असा आरोप अंबादास दानवेंनी केला.**

असं असलं तरीही त्यांनी शिंदे गटात जाण्यावर आता भाष्य केलं आहे."मी मागच्या दहा वर्षांपासून लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक आहे. मी माझी इच्छा लपवून ठेवलेली नाही. पक्षप्रमुखांनाही हे माहीत आहे. अजूनही कोणताही चेहरा त्यांनी दिलेला नाही. निर्णय घ्यायला अवधी आहे. मी इच्छा व्यक्त केली आहे. आता ते कुणाला उमेदवारी देणार ते पाहू. एकच बाजू चालत असेल आणि एकांगीपणे कुणी वागत असेल तर त्याची दखल उद्धव ठाकरेंनी घेतली पाहिजे.

चंद्रकांत खैरे मला कायम डावलत असतात, ही गोष्ट आजची नाही. मी चंद्रकांत खैरेंसाठी पक्षाचं काम करत नाही उद्धव ठाकरेंसाठी काम करतो. खैरे काय म्हणतात, माझ्याविषयी काय बोलतात त्याच्याशी मला काहीही घेणंदेणं नाही. " असं अंबादास दानवेंनी म्हटलं आहे.

हे सगळं असलं तरीही त्यांना त्यांच्या आईने ताकीद दिली आहे त्याबद्दलही त्यांनी भाष्य केलं आहे. अंबादास दानवे म्हणाले, "एखाद्या निवडणुकीसाठी पक्षाशी गद्दारी करणार नाही. मी एकनाथ शिंदे यांच्याबरोबर जाणार नाही. मी शिवसेनेतच आहे. शिवसेना आमचीच आहे.

माध्यमांना बातम्या हव्या आहेत त्यामुळे या चर्चा होत आहेत. मला माझ्या आईने स्पष्ट सांगितलं आहे, बाळासाहेबांच्या विचारांशी आणि उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाशी बेईमानी करु नकोस, तू असं केलंस तर तुझा आणि माझा संबंध राहणार नाही.

माझ्या घरात लग्न झालं त्यावेळी जात्यावर दळताना तिने उद्धव ठाकरेंवर गाणं रचलं होतं. माझी आई इतकी संवेदनशील आहे. हिंदुत्वावर आईचं प्रेम आहे. त्यामुळे मी एकनाथ शिंदेंबरोबर जाण्याचा काही प्रश्नच येत नाही. माझ्याविषयी अफवा पसरवल्या जात आहेत." एबीपी माझाशी संवाद साधत असताना अंबादास दानवेंनी हे वक्तव्य केलं आहे.



### शिंदे सेनेबरोबर जाणार नाही

» लोकसभेसाठी उमेदवारी हवी आहे हे तर मी उद्धव ठाकरेंना सांगितलं आहे. मागच्या दोन्हीवेळा मी हे सांगितलं होतं. मी पक्षाचा सैनिक आहे. समजा खैरेंना उमेदवारी दिली तरीही मी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं काम मी करेन. मागच्यावेळीही तिकिट मिळालं नव्हतं तरीही निवडणूक प्रमुख म्हणून मी काम केलं आहे. काहीही झालं तरीही मी एकनाथ शिंदेंबरोबर जाणार नाही.


# निवडणुकीचा बिगुल वाजला!

## महाराष्ट्रात मतदानाचे पाच टप्पे; मतमोजणी 4 जून

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकीच्या तारखा केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केल्या आहेत. देशात लोकसभेची निवडणूक १९ एप्रिल ते १ जून दरम्यान पार पडणार आहे. एकूण ७ टप्प्यांमध्ये मतदान पार पडणार आहे. केंद्रामध्ये पुन्हा कोण सत्तेत येणार हे ४ जून रोजी लागणाऱ्या निकालामधून स्पष्ट होणार आहे. निवडणुकीची घोषणा झाल्याच्या क्षणापासून देशात आचारसंहिता लागू झाल्याची घोषणाही निवडणूक आयोगाने केली आहे. महाराष्ट्रातही ५ टप्प्यांत निवडणूक होणार आहे. यंदा १८ व्या लोकसभेसाठी निवडणूक होत आहे. लोकसभेच्या निवडणुकीसह देशातील काही राज्यात विधानसभेच्याही निवडणुका होणार आहेत. त्यानुसार, सिक्कीमच्या ३२ जागांवर आणि अरुणाचल प्रदेशच्या ६० जागांवर १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तर, आंध्र प्रदेशच्या १७५ जागांसाठी १३ मे रोजी मतदान होईल.**






२०१९ साली स्थापन झालेल्या मोदी सरकारचा कार्यकाळ ६ जून रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे देशात लोकसभेच्या निवडणुका घेण्यात येत आहे. त्यानुसार, १९ एप्रिलपासून लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला सुरुवात होणार असून २ जून रोजी सात टप्पे संपणार आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आणि सुखबीर सिंह यांनी निवडणुकीच्या तारखांची घोषणा केली. निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमारही यावेळी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी, आम्ही निवडणूक आयोगामधील सर्व अधिकारी या लोकसभा निवडणुकीसाठी तयार आहोत त्यामुळे भारतीयांनीही मोठ्या संख्येने या निवडणुकीच्या मतदानामध्ये सहभागी होऊन आपल्या बोटांना शाई लावून घ्यावी असे आवाहन केले आहे. लोकसभेचा कार्यकाळ १६ जून रोजी संपत असून, त्यापूर्वी निवडणुका पार पाडणे ही आमची जबाबदारी आहे.

या निवडणुका लोकशाही मार्गाने पार पडाव्यात यासाठी पोषक वातावरण देण्याची आमची जबाबदारी आहे, असे राजीव कुमार म्हणाले. देशभरातील ८०० हून अधिक जिल्हाधिकाऱ्यांशी मी स्वत: चर्चा केली आहे, असेही राजीव कुमार म्हणाले आहेत. निवडणुका पूर्णपणे स्वतंत्र आणि निष्पक्षपणे होतील असे आश्वासन निवडणूक आयुक्तांनी दिले. एनडीए विरुद्ध इंडिया लढाई : भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) विरुद्ध काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीदरम्यान थेट लढत होणार आहे. अनेक निवडणूकपूर्व चाचण्यांनी देशात तिसऱ्यांदा भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत येईल असा अंदाज व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान होतील असा निवडणूकपूर्व चाचण्यांचा कल सांगतो. महाराष्ट्रामध्येही महायुतीच्या बाजूने जनतेचा कल असल्याचे निवडणूकपूर्व चाचण्यांमध्ये दिसत आहे. मात्र प्रत्यक्ष मतमोजणीच्या कोण कोणाला मात देते आणि देशात कोणाची सत्ता येते हे स्पष्ट होईल. महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यात निवडणूक होणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली आहे. महाराष्ट्रात १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे, आणि २० मे रोजी मतदान होणार आहे. तसे च २६ विधानसभा जागांवर पोटनिवडणूक होणार असून यात महाराष्ट्रातील एका जागेचा समावेश आहे.

अरुणाचल प्रदेश, अंदमान-निकोबार, आंध्र प्रदेश, चंदीगढ, दादरा नगर हवेली, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, हरियाणा, केरळ, लक्षद्वीप, लडाख, मिझोराम, मेघालय, नागालँड, पुद्दुचेरी, सिक्कीम, तामिळनाडू, पंजाब, तेलंगणा, उत्तराखंड आदी राज्यांत एका टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. कर्नाटक, राजस्थान, त्रिपुरा, मणिपूर या राज्यांमध्ये दोन टप्प्यांत मतदान होईल. तर, छत्तीसगड, आसाममध्ये तीन टप्प्यांत मतदान होईल. ओडिशा, मध्य प्रदेश, झारखंड या राज्यांमध्ये चार टप्प्यात मतदान होणार असून महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीरमध्ये पाच टप्प्यात मतदान होईल.

### 55 लाख ईव्हीएम वापरल्या जाणार

भारतात होणारी लोकसभेची निवडणूक ही जगातील सर्वाधिक मतदार असलेल्या देशातील निवडणूक ठरणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने याच वर्षी जानेवारी महिन्यामध्ये दिलेल्या माहितीनुसार देशातील ९६ कोटी ८८ लाख लोक मतदान करण्यास पात्र आहे. ९७ कोटी लोकांपैकी ४७ कोटी १० लाख महिला आहेत. मतदानासाठी पात्र असलेल्या भारतीयांमध्ये ४९ कोटी ७० लाख पुरुष आहेत. भारतामध्ये ४८ हजार ४४ तृतीयपंथी मतदार आहेत. देशभरामध्ये लोकसभा निवडणुकीसाठी तब्बल १०.५ लाख मतदानकेंद्र उभारली जाणार असल्याचेही निवडणूक आयोगाने सांगितले आहे. मतदानासाठी पात्र असलेल्या १८ ते १९ वयोगटातील नवमतदारांची संख्या १ कोटी ८४ लाख इतकी असल्याचेही निवडणूक आयोगाने स्पष्ट केले. ८२ लाख प्रौढ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहे. १०० वर्षांपेक्षा अधिक वयोगटाचे २ लाखांहून अधिक मतदार आहेत. मागील म्हणजेच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये ९० कोटी भारतीय मतदान करण्यासाठी पात्र होते. १.५ कोटी निवडणूक अधिकारी या निवडणुकीचे काम पाहणार आहेत. ५५ लाख ईव्हीएम वापरल्या जाणार असल्याचेही निवडणूक आयुक्तांनी सांगितले आहे.

# निवडणूक काळातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ९८ पथके

## लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू, जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची होणार तपासणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने नेमलेली ४६ भरारी पथके व जिल्ह्याच्या सीमेवर नेमलेली ५२ पथके शनिवारपासूनच जिल्ह्यात येणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू करणार आहेत.**

मतदान केंद्रे, संवदेनशील केंद्रे निश्चित झाली असून, निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. सोलापूर जिल्ह्यात यंदा लोकसभा निवडणुकीसाठी ३५ लाख ७८ हजार ९७२ मतदार आहेत. क्केवारी वाढावी, इव्हीएमबाबतचे गैरसमज दूर व्हावेत, ज्यांना इव्हीएम वापरायला जमत नाही त्यांच्यासाठी जिल्हा प्रशासनाने स्वतंत्र मोहीम राबविली आहे. आता जिल्ह्यात चार हजार ८०० कंट्रोल युनिट (मशिन) तयार असून, एकूण मतदान केंद्राच्या २५ टक्के जादा मशिन देण्यात आल्या आहेत. पण,




सोलापूर जिल्ह्यात चार टक्के मशिन (१६२) कमी होत्या, त्यात चार दिवसांपूर्वी वाढ करण्यात आली आहे. एका कंट्रोल युनिटवर ३२ मशिन बसू शकतात. मात्र, एका लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात ३८४ पेक्षा अधिक उमेदवार उतरल्यास त्या त्यावेळी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही केली जाणार आहे. तूर्तास किती उमेदवार निवडणुकीसाठी अर्ज करतील व त्यातील किती जण निवडणूक लढतील याकडे सर्व अधिकाऱ्यांचे लक्ष आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे नांदणी, मरवडे, वाघदरी येथे सीमा तपासणी नाके तयार केले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील प्रत्येक मद्यविक्री दुकानांमध्ये किती विक्री झाली, याची माहिती घेतली जाणार आहे. तसेच जिल्ह्याअंतर्गत व जिल्ह्याबाहेरून येणाऱ्या संशयास्पद वाहनांची तपासणी केली जाणार असून ढाबे-हॉटेल्सवर छापेमारी होणार आहे. अवैधरीत्या दारू विक्री करणाऱ्यांवर देखील कडक कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने सहा पथके व एक विशेष पथक नेमले असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांनी दिली.

# “सहा कोटींची कार घेतली अन् आता सायकल का चालवतोस?

बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याचा आगामी चित्रपट ‘भूल भूलैया ३’ च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. आता अलीकडेच अभिनेत्याने त्याच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. कार्तिकने एक नवीन आलिशान अशी रेंज रोव्हर एसयुव्ही खरेदी केली आहे, ज्याची किंमत ६ कोटी रुपये आहे. परंतु कार खरेदी केल्यानंतर, अभिनेता आता सायकल चालवताना दिसला आहे, यावर चाहत्यांनी अभिनेत्याला काही धमाल प्रश्नदेखील विचारले आहेत. कार्तिकने नुकतंच एक रील शेअर केलं आहे, ज्यामध्ये तो सायकल चालवताना दिसत आहे. त्यानंतर त्याने या रीलवर आलेल्या चाहत्यांच्या काही कमेंट्सना उत्तरही दिले. जेव्हा चाहत्यांनी अभिनेत्याला ६ कोटी रुपयांची नवीन कार खरेदी केल्यानंतरही सायकल का चालवत आहे असे विचारले. तेव्हा कार्तिकने त्याला भन्नाट उत्तर





दिले आहे.कार्तिकने हे रील त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिले की, “आता मी सायकलवरून सेटवर जाण्याचा विचार करत आहे.” अभिनेत्याच्या या रीलवर टिप्पणी करताना एका यूजरने म्हटले की, “मला तुझी ६ कोटी रुपयांची कार दे.” या कमेंटवर कार्तिकने मजेशीर उत्तर दिले आणि म्हणाला, “मी दुसऱ्या एका मित्राला वापरायला दिली आहे... ती परत आल्यावर सांगेन.

## ते मला हातोड्याने मारायचे

रवी किशन किरण रावच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘लापता लेडीज’ या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसले. या चित्रपटाच्या निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी वडिलांबरोबरच्या नात्याबद्दल सांगितलं. रामलीलामध्ये अभिनय करण्यास सुरुवात केल्यावर वडील खूप रागावले होते. पण नंतर मात्र आपण सिनेसृष्टीत करिअर केल्यावर त्यांना माझा खूप अभिमान वाटत होता, असं रवी किशन यांनी सांगितलं. ‘ब्रुट’ला दिलेल्या एका मुलाखतीत रवी किशन यांनी खुलासा केला की वडिलांच्या रागामुळे त्यांना १७ व्या वर्षी घरातून पळून जावं लागलं होतं. “माझे वडील मला खूप मारत होते, ते मला हातोड्याने मारायचे. त्यांना माझा खून करायचा होता आणि माझ्या आईला माहित होतं की बाबा मला मारू शकतात. ते माझा जीव घेण्यास मागेपुढे पाहणार नाही. त्यामुळे आई मला म्हणाली की ‘पळून जा’. खिशात ५०० रुपये घेऊन मी घर सोडलं आणि मुंबईला जाणारी ट्रेन पकडली होती,” असं रवी किशन म्हणाले.रवी किशन यांनी वडिलांच्या अशा वागणुकीचं समर्थनही केलं. “ते पुजारी होते आणि ब्राह्मण असल्याने मी शेती करावी किंवा पुजारी व्हावं किंवा सरकारी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. आपल्या कुटुंबात एखादा कलाकार जन्माला येऊ शकतो, असं त्यांना कधीच वाटलं नव्हतं.

## सारा खानने केला रॅम्प वॉक



‘मर्डर मुबारक’ या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर ‘विरल भयानी’ या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. ‘शेरनी’, ‘क्यूट लूक’ अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ‘मर्डर मुबारक’नंतर २१ मार्चला ओटीटीवर तिचा ‘ऐ वतन मेरे वतन’ चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात साराने उषा मेहता यांची भूमिका निभावली आहे. धर्मा प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या या चित्रपटात सारासह अभिनेता इमरान हाश्मी पाहायला मिळणार आहे.

‘मर्डर मुबारक’ या चित्रपटामुळे अभिनेत्री सारा अली खान सध्या चांगलीच चर्चेत आली आहे. सारा नेहमी तिच्या व्यावसायिक व वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. अशातच सध्या साराचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतं आहे. हा व्हिडीओ पाहून अनेकजण तिचं कौतुक करत आहेत. अभिनेत्री सारा अली खानचा हा व्हायरल व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर ‘विरल भयानी’ या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत, सारा भाजलेल्या जखमेसह आत्मविश्वासाने रॅम्प वॉक करताना दिसत आहे. ती निळ्या रंगाच्या लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. यावेळी तिने पोटावर भाजलेल्या जखमेचा मेकअप न करताना, ती जखम फ्लॉन्ट करताना पाहायला मिळत आहे.साराचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून नेटकरी तिचं कौतुक करत आहे. ‘शेरनी’, ‘क्यूट लूक’ अशा प्रतिक्रिया नेटकरी देत आहेत.दरम्यान, साराच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ‘मर्डर मुबारक’नंतर २१ मार्चला चित्रपटात साराने उषा मेहता यांची भूमिका निभावली आहे.

## देवाशिष माखिजा यांनी व्यक्त केली खंत

मनोज बाजपेयींच्या ‘जोरम’ या चित्रपटाचे दिग्दर्शक देवाशिष माखिजा यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. यामध्ये त्यांनी चित्रपट, राजकारण, कला, त्यांचा प्रवास आणि संघर्ष याविषयी सांगितले. एक चांगला चित्रपट बनवण्यासाठी किती मोठा संघर्ष करावा लागतो हे त्याने या मुलाखतीमध्ये सांगितले. ‘आज्जी’ आणि ‘जोरम’सारखे अप्रतिम चित्रपट बनवल्यानंतरही पुढचा चित्रपट बनवणे कठीण असल्याचं त्याने स्पष्ट केलं. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ‘जोरम’ला अप्रतिम रेटिंग मिळाले तसेच समीक्षकांनीही चित्रपटाला उचलून धरले पण त्यानंतरही देवाशिष यांचा संघर्ष सुरूच आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये देवाशिष म्हणाले, “२० वर्षे या इंडस्ट्रीमध्ये काम करूनसुद्धा माझ्या एकाही चित्रपटातून आर्थिक फायदा मला झालेला नाही. माझी चाळीशी उलटून चालली आहे अन् म्हणालेकमावले नाहीत. मला माझ्या घराचे भाडे भरणेदेखील जमत नाहीये. गेले पाच महीने मी भाडे दिलेले नाही. सध्या मी माझ्या घरमालकाकडे विनंती करतो आहे की त्याने मला घराबाहेर काढू नये. जेव्हा तुम्ही तुमच्या कलागुणांना अधिक प्राधान्य देता तेव्हा त्याची एक मोठी किंमत तुम्हाला चुकवावी लागते.” हा एक संघर्ष आणि यासाठी ते तयार आहेत असंही देवाशिष या मुलाखतीदरम्यान म्हणाले. देवाशिष यांनी याआधीही या विषयावर भाष्य केलं आहे. त्याने २०१७ मध्ये रिलीज त्यांचा पहिला चित्रपट आला.




## क्रिती आणि पुलकित यांनी बांधली लग्नगाठ

अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि अभिनेता पुलकित सम्राटयांनी लग्नगाठ बांधली आहे. दोघांचा लग्नसोहळा धुमधडाक्यात पार पडला आहे. क्रिती आणि पुलकित या नवविवाहित जोडप्याने नुकतेच त्यांच्या लग्नसोहळ्याचे खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यांच्या या फोटोंवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.क्रिती आणि पुलकित यांनी शेअर केलेल्या लग्नसोहळ्याच्या फोटोमध्ये दोघेही खास लूकमध्ये दिसत आहेत. लग्नसोहळ्यासाठी क्रितीनं पिंक कलरचा लेहंगा आणि स्टोनची ज्वेलरी असा लूक केला होता. तर पुलकितनं लग्नसोहळ्यात सी ग्रीन कलरची शेरवानी परिधान केली होती. पुलकितच्या शेरवानीच्या डिझाईननं अनेकांचे लक्ष वेधले होते.2014 मध्ये पुलकितनं श्वेता रोहिरासोबत लग्न केले होते. श्वेता ही सलमान खानची 'राखी सिस्टर' आहे. पण पुलकित आणि श्वेता यांचा संसार फार काळ टिकला नाही. पुलकित आणि श्वेता यांनी 2015 मध्ये घटस्फोट घेतला.वीरे की वेडिंग आणि तैश या चित्रपटांमध्ये क्रिती आणि पुलकित यांनी काम केलं आहे. पण पागलपंती या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान क्रिती आणि पुलकित हे एकमेकांच्या प्रेमात पडले. फुकरे, फुकरे रिटर्न्स, जय हो या चित्रपटात पुलकितनं काम केलं.

# लवकरच आपला गाशा गुंडाळलेले संघ

## केवळ एकच सीझन खेळलेला संघ अर्थात कोची टस्कर्स

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**इंडियन प्रीमियर लीगचा १७वा हंगाम म्हणजेच आयपीएल २०२४ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. गेल्या १७ वर्षांच्या आयपीएलच्या इतिहासात अनेक संघ आहेत, काही संघांनी चाहत्यांच्या मनात आपलं स्थान निर्माण केलं. पण त्यापैकी काही संघांनी लवकरच आपला गाशा गुंडाळला तर तर अशाच काही निकाली निघालेल्या संघांबद्दल आपण जाणून घेऊया.**

आयपीएलचा केवळ एकच सीझन खेळलेला संघ म्हणजे कोची टस्कर्स केरळा. कोची क्रिकेट प्रायव्हेट लिमिटेड या कन्झोर्टियमने १५३३ कोटी रूपयांना संघाची मालकी मिळवली. केरळच्या सहमालकांमध्ये रवींद्र आणि शैलेंद्र गायकवाड यांच्यासह खासदार आणि काँग्रेस नेते शशी थरूर यांचा समावेश होता. सुरूवातीला संघाचं नाव इंडी कमांडोज केरळा होतं पण नंतर ते बदलण्यात आलं.दिग्गज आणि विस्फोटक फलंदाज महेला जयवर्धने कोची संघाचा कर्णधार होता तर वीवीएस लक्ष्मण, मुथय्या मुरलीधरन, ब्रेंडन मॅक्युलम, ब्रॅड हॉज आणि जडेजासारखे एकापेक्षा एक दिग्गज खेळाडू होते पण पहिल्याच हंगामात संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी होते.संघ मालकांमधील वादामुळे २०११चा हंगाम सुरू होण्यापूर्वी फ्रँचायझी फीच्या १० टक्के रक्कम बँक गॅरंटी म्हणून ठेवण्यात फ्रेंचायझी अयशस्वी ठरली. बीसीसीआयने दावा केला की त्यांनी फ्रँचायझी मालकांना पेमेंटसाठी वारंवार सांगूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. १९ सप्टेंबर २०११ रोजी, तत्कालीन बीसीसीआय अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांनी घोषणा केली की फ्रँचायझी बँक गॅरंटी रक्कम भरण्यात अयशस्वी ठरवली त्यामुळे संघाला निकाली काढण्यात आले. २०१२ च्या लिलावात कोची संघातील खेळाडूंना सामील करून घेतलं. संघ बरखास्त केल्याने कोची संघ व्यवस्थापनाने बीसीसीआयविरूध्द न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. त्यानंतर २०१५ मध्ये या संघाच्या बाजूने निकाल लागल्याने न्यायाधीश लाहोटी यांनी नुकसान भरपाई म्हणून ५५० कोटी रूपये बीसीसीआयने देण्याचे आदेश दिले.२००८ मध्ये सुरू झालेल्या




इंडियन प्रीमियर लीगमध्ये आठ संघांपैकी एक संघ होता, डेक्कन चार्जर्स. पहिल्याच सत्रातील खराब कामगिरीनंतर या संघाने २००९ मध्ये विजेतेपद पटकावले. दक्षिण आफ्रिकेत खेळल्या गेलेल्या या आयपीएलमध्ये ॲडम गिलक्रिस्टच्या नेतृत्त्वाखालील संघाने जेतेपद पटकावले. रोहित शर्मा हा त्या संघाचा कर्णधार होता. ॲडम गिलख्रिस्ट, अँड्यू सायमंड्स, हर्षेल गिब्स, शाहिद आफ्रिदी, चामिंडा वास असे दिग्गज खेळाडू या संघाचा भाग होते.डेक्कन क्रोनिकल या कंपनीने १० कोटी ७० लाख रूपयांना दहा वर्षांसाठी संघाची मालकी मिळवली होती. २००९ च्या आयपीएल जेतेपदानंतर २०१० मध्ये संघाने बाद फेरी गाठली. २०११ मध्ये कुमार संगकारा संघाचा कर्णधार होता, त्यावर्षी डेक्कन संघ सातव्या स्थानावर राहिला. तर २०१२ मध्ये अधिक घसरण होत आठव्या स्थानी त्यांना समाधान मानावे लागले. १४ सप्टेंबर २०१२ मध्ये आयपीएल गव्हर्निंग काऊंसिलने कराराच्या अटींचे उल्लंघन केल्याने संघावर कायमची बंदी घातली.बेकायदेशीर पध्दतीने बीसीसीआयने संघ बरखास्त केल्याचा दावा करत डेक्कन क्रोनिकलने विरुद्ध याचिका दाखल केली. आठ वर्षांनंतर जुलै २०20 मध्ये न्यायालयाने डेक्कन संघाच्या बाजूने निर्णय दिला आणि नुकसान भरपाई म्हणून बीसीसीआयने डेक्कन क्रोनिकल कंपनीला ४८०० कोटी रुपये द्यावेत, असे सांगितले.यानंतर सन टीवी ग्रुपने मालकी मिळवत संघाचे नाव सनरायजर्स हैदराबाद असे ठेवले आणि नव्याने संघबांधणी केली.कोची संघासोबतच पुणे वॉरियर्स संघालाही २०११ मध्ये आयपीएलमध्ये सामील केले. सहारा ग्रुप स्पोर्ट्स लिमिटेड कंपनीला संघाची मालकी मिळाली. पारंपारिक वेशातील म्हणजेच साडी घातलेल्या चीयरलीडर्स सहाराने आणल्या होत्या.भारताचा उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग या संघाचा कर्णधार होता. पहिल्याच हंगामानंतर युवराजला कॅन्सरचे निदान झाले. २०१३ मध्ये त्याने पुन्हा संघात पुनरागमन केले. सौरव गांगुलीने सुध्दा या संघाचे कर्णधारपद भूषवले. २०१३ मध्ये गांगुलीने निवृत्त झाल्याने अँजेलो मॅथ्यूजने संघाचे नेतृत्त्व केले.

### गुजरात लायन्स (2016,2017)

मॅचफिक्सिंगच्या आरोपांमुळे चेन्नईसोबत बंदी घातलेला दुसरा संघ होता, राजस्थान रॉयल्स. या संघाची जागा गुजरात लायन्सने घेतली. इंटेक्स टेक्नॉलॉजी कंपनीने या संघाची मालकी मिळवली. सुरेश रैना या संघाचा कर्णधार होता आणि त्याच्या ताफ्यात ब्रेंडन मॅकक्युलम, आरोन फिंच, रवींद्र जडेजा, ड्वेन ब्राव्हो, ड्वेन स्मिथ, प्रवीण कुमार, धवल कुलकर्णी, अँड्यू टाय असे दिग्गज खेळाडू होते. पहिल्याच हंगामात या शिलेदारांनी बाद फेरी गाठली, मात्र क्वालिफायर सामन्यांमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला.दुसर्‍या हंगामात गुजराततर्फे खेळणार्‍या अँड्यू टायने हॅट्रिक घेतली तर सुरेश रैनाच्या बॅटमधून धावांचा पाऊस पाहायला मिळाला. तरीही संघाने त्या हंगामाचा शेवट सातव्या स्थानी राहून केला. चेन्नईप्रमाणेच राजस्थान संघावरील बंदीची कारवाई पूर्ण होताच गुजरात लायन्स संघाचा प्रवास २०१७ मध्ये थांबला.

# आरसीबी फायनलमध्ये दिल्लीसोबत होणार सामना

## अय्यर आयपीएलच्या सुरुवातीच्या सामन्यांना मुकण्याची शक्यता

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्मृती मंधानाच्या नेतृत्वातील आरसीबीनं फायनलमध्ये धडक मारली आहे. एलिमेटनरच्या सामन्यात आरसीबीनं हरमनप्रीत कौरच्या मुंबईचा पाच धावांनी पराभव केला. रविवारी दिल्लीच्या मैदानावर आरसीबी आणि दिल्ली यांच्यामध्ये सामना रंगणार आहे.**




अटीतटीच्या सामन्यात आज आरसीबीनं मुंबईचा पराभव केला. अखेरच्या चेंडूपर्यंत हा सामना रंगला होता. आरसीबीनं मुंबईपुढे विजयासाठी १३६ धावांचे आव्हान ठेवलं होतं. पण मुंबईचा संघ निर्धारित २० षटकात ६ विकेटच्या मोबदल्यात १३० धावांपर्यंतच मजल मारु शकला. अखेरच्या तीन षटकात आरसीबीने सामना फिरवला. या विजयासह आरसीबीने फायनलमध्ये प्रवेश केला आहे. मुंबई इंडियन्सनं सामन्यावर पकड मिळवली होती. पण अखेरच्या तीन षटकात हराकिरी केली. हरमप्रीत कौरनं मोक्याच्या क्षणी विकेट फेकली. मुंबईकडून हरमनप्रीत कौर हिनं सर्वाधिक ३३ धावांचं योगदान दिलं. अमेलिया कैर हिनं नाबाद २७ धावांचं योगदान दिलं. त्याशिवाय नेट सीवर ब्रंट हिने २३ धावा जोडल्या. त्याआधी सलामी फलंदाज यास्तिका भाटिया आणि हॅली मॅथ्यूज यांनी पहिल्या विकेटसाठी २७ धावांची भागिदारी केली. हॅली मॅथ्यूज १५ धवांकडून बाद झाली. तर यास्तिका भाटिया १९ धावा काढून एलिस पॅरीच्या चेंडूवर बाद झाली. आरसीबीकडून श्रेयंका पाटील हिने सर्वाधिक भेदक मारा केला. तिनं २ विकेट घेतल्या. त्याशिवाय एलिस पैरी, सोफी मोलेनिक्स, जॉर्जिया वेयरहम आणि आशा शोभना यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या आरसीबीनं निर्धारित २० षटकात १३५ धावांपर्यंत मजल मारली. आरसीबीची सुरुवात अतिशय खराब झाली होती. आरसीबीनं ठरावीक अंतराने विकेट फेकल्या.

### आरसीबीने सामना फिरवला

स्मृती मंधाना आणि सोफिया डिवाइन यांनी खराब सुरुवात दिली. त्याशिवाय ऋचा घोषही स्वस्तात तंबूत परतली. पण एलिस पैरी हिने आसीबीचा डाव सावरला. अटीतटीच्या सामन्यात आज आरसीबीनं मुंबईचा पराभव केला. अखेरच्या चेंडूपर्यंत हा सामना रंगला होता. आरसीबीनं मुंबईपुढे विजयासाठी १३६ धावांचे आव्हान ठेवलं होतं. पण मुंबईचा संघ निर्धारित २० षटकात ६ विकेटच्या मोबदल्यात १३० धावांपर्यंतच मजल मारु शकला. अखेरच्या तीन षटकात आरसीबीने सामना फिरवला. या विजयासह आरसीबीने फायनलमध्ये प्रवेश केला आहे. मुंबई इंडियन्सनं सामन्यावर पकड मिळवली होती. पण अखेरच्या तीन षटकात हराकिरी केली. हरमप्रीत कौरनं मोक्याच्या क्षणी विकेट फेकली.